महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

फोन क्र : (०२०) २६१२७९०६ Website: www.mahaprisons.gov.in

शुभेच्छा संदेश

# महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा वार्तापत्र

माहे- नोव्हेंबर-२०२५

## संपादकीय संदेश



श्री.सुहास वारके
अपर पोलीस महासंचालक व कारागृह
महानिरीक्षक व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रिय सर्व अधिकारी व कर्मचारी,

दिनांक १४.०९.२०२५ रोजी बाल दिवसानिमीत्त कारागृह विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या "गळाभेट" या अत्यंत संवेदनशील व मानवी मूल्यांवर आधारित कार्यक्रमाच्या निमित्ताने आपणा सर्वांशी संवाद साधताना मला विशेष आनंद होत आहे.

कारागृह ही केवळ शिक्षा देणारी व्यवस्था नसून, सुधारणा, पुनर्वसन आणि मानवी नातेसंबंध जपणारी व्यवस्था आहे, ही संकल्पना या कार्यक्रमातून अधोरेखित होत आहे. कारागृहात असलेला प्रत्येक बंदी हा कोणाचा तरी वडील, आई, पालक किंवा कुटुंबीय आहे. विशेषतः 18 वर्षांखालील निरागस मुला-मुलींसाठी पालकांपासून दूर राहणे हे मानसिकदृष्ट्या अत्यंत कठीण असते.

महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

## शुभेच्छा संदेश

"गळाभेट" या उपक्रमाच्या माध्यमातून बंदिवानांना त्यांच्या लहान मुलांशी प्रत्यक्ष भेट, संवाद व भावनिक नाते जपण्याची संधी मिळते. या भेटीमुळे केवळ मुलांचे मनोबल वाढत नाही, तर बंदिवानांच्या वर्तणुकीत सकारात्मक बदल, सुधारणा व पुनर्वसनाच्या प्रक्रियेला गती मिळते.

हा उपक्रम बालहक्क, मानवाधिकार आणि सुधारसेवेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. मुलांवर त्यांच्या पालकांच्या गुन्ह्याचा मानसिक भार पडू नये, त्यांचे बालपण सुरक्षित व सुसंस्कृत व्हावे, यासाठी कारागृह प्रशासन कटिबद्ध आहे.

मी कारागृह विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाचे विशेष अभिनंदन करतो, ज्यांनी अत्यंत संवेदनशीलतेने, नियोजनबद्ध पद्धतीने आणि मानवतावादी दृष्टिकोनातून हा कार्यक्रम यशस्वीपणे राबविला आहे.

भविष्यातही अशा प्रकारचे सुधारणा व कुटुंब केंद्रित उपक्रम सातत्याने राबवून, कारागृह व्यवस्थेला अधिक लोकाभिमुख, मानवी आणि सुधारक बनवण्याचा आपला संकल्प आहे.

जय हिंद.

**बंदी गळाभेट उपक्रम येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे, टाटा ट्रस्ट प्रयास, मुंबई व इंडिया व्हीजन फांऊडेशन, दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने**

## येरवडा मध्यवर्ती कारागृह

मा. डॉ. सुहास वारके (भा.पो.से) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे व मा. श्री. योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली दि.१४.११.२०२५ रोजी बंदी गळाभेट उपक्रम येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे, टाटा ट्रस्ट प्रयास, मुंबई व इंडिया व्हीजन फांऊडेशन, दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने येरवडा मध्यवर्ती कारागृह व येरवडा महिला कारागृह येथे राबविण्यात आला.

सदर बंदी गळाभेट उपक्रमचा उद्देश कारागृहातील शिक्षा बंद्यांची शिक्षा भोगुन पुर्ण झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींनी आणि समाजाने त्यांना स्विकृत करुन आणि त्यांना समानतेची वागणूक मिळावी आणि बंद्यांना आपल्या कुटुंबाबद्दल सहानुभुती व आपूलकी निर्माण होण्याच्या व कारागृह विभागाच्या सुधारणा व पुर्नवसन या बिद्र वाक्याचा उद्देश साध्य होण्याच्या दृष्टीने शिक्षाधीन बंदी आणि त्याच्या १८ वर्षाखालील मुले-मुली, नात-नातू यांची समक्ष भेट घडवून आणणे आवश्यक होते, जेणेकरुन समक्ष भेटीत बंदी व त्यांचे नातेवाईकांमध्ये सुसंवाद झाल्याने घरापासून जास्त कालावधीसाठी लांब राहील्याने येणारी निराशा / मानसिक ताणतणाव कमी होण्यास मदत होईल. त्यानुषंगाने हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. सदर उपक्रमामध्ये येरवडा मध्यवर्ती कारागृह व येरवडा महिला कारागृह येथील ५१ पुरुष व २७ महिला बंदी व त्यांचे १४० मुले-मुली, नात-नातू यांनी प्रत्यक्ष भेटी घेवून सहभाग नोंदवला.




**मुंबई जिल्हा महिला कारागृह व भायखळा जिल्हा कारागृह येथे बालदिनाचे औचित्य साधुन कारागृहात बंदीस्त असलेल्या महिला बंदी व त्यांचे कारागृहाबाहेर असणारी मुले यांचेकरीता प्रत्यक्ष गळाभेट कार्यक्रम आयोजित**

## मुंबई जिल्हा महिला कारागृह व भायखळा जिल्हा कारागृह

दिनांक-14.11.2025 रोजी मुंबई जिल्हा महिला कारागृह व भायखळा जिल्हा कारागृह येथे बालदिनाचे औचित्य साधुन कारागृहात बंदीस्त असलेल्या महिला बंदी व त्यांचे कारागृहाबाहेर असणारी मुले यांचेकरीता प्रत्यक्ष गळाभेट कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कारागृहातील महिला बंदी व त्यांचे बाहेर असलेल्या 18 वर्षाखालील लहान मुले यांची प्रत्यक्ष गळाभेट कार्यक्रम आयोजित करण्यात आला.सदर कार्यक्रमास 39 लहान मुले व 25 महिला बंदी यांनी त्याचा लाभ घेतला. यामुळे कारागृहात दाखल बंद्यांचे व मुलांचे नात्यातील दुरावा कमी होण्यासाठी मदत झाली.गळाभेटी दरम्यान महिला बंद्यांना यांच्या मुलांना पाहुन अश्रु अनावर झाले.कारागृहाबाहेरील लहान मुलांना आपल्या माता पिता यांची भेट घेण्याची तीव्र इच्छा असते त्यांचे पासून दूर असल्यामुळे त्यांच्या नात्यांतील पोकळी निर्माण झालेली असते. तो दुरावा गळाभेटीसाठीच्या माध्यमातुन दूर करण्यासाठी कारागृह प्रशासन नेहमीच तत्पर असते. सदर भेटी प्रसंगी महिला बंदी व त्यांचे लहान मुलांमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले. गळाभेटीसाठी आलेल्या मुलांना शैक्षणिक साहित्य, पाणी बॉटल, अल्पोपहार व खाऊ देण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी प्रयास व फनक्लब फाऊंडेशन या सामाजिक संस्थेचे सहकार्य लाभले.





महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

नागपूर मध्यवर्ती कारागृहाध्ये दिनांक १४.११.२०२५ बालदिनानिमीत्त गळाभेट कार्यक्रम

# नागपूर मध्यवर्ती कारागृह

श्री वैभव आगे, कारागृह अधीक्षक तथा कारागृह उपमहानिरीक्षक पुर्वविभाग नागपूर, यांच्या मार्गदर्शनाखाली कारागृह विभागाचे सुधारणा व पुनर्वसन या ब्रिदवाक्याचा उद्देश साध्य होण्याच्या दृष्टीने शिक्षाधीन बंदी आणि त्यांच्या १८ वर्षाखालील मुले-मुली, नात-नातू व भाऊ बहीन यांच्यात भेट होऊन घरापासून जास्त कालावधीसाठी लांब राहील्याने येणारी निराशी कमी होईल.बंदी आणि त्यांचे नातेवाईकामध्ये सुसंवाद घडावा आणि बंद्यामध्ये सकारात्मक बदल घडविण्यासाठी कारागृहात गळाभेट उपक्रम राबविण्यात आला.

नागपूर मध्यवर्ती कारागृहाध्ये दिनांक १४.११.२०२५ बालदिनानिमीत्त गळाभेट कार्यक्रम बंदयाच्या १८ वर्षाखालील मुले-मुली करीता गळाभेट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.सदर कार्यक्रमासाठी सन्मा. श्रीगजानन निमदेव, राज्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर यांच्या प्रमुख उपस्थित पार पडला.

कार्यक्रमाचे उदघाटक व मुख्य अतिथी सन्मा. श्री गजानन निमदेव, राज्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर यांनी बंदी व त्याचे मुलांना कारागृहातील विविध उपक्रम व सुविधामुळे बंदयाचे कौशल्य व कलागुणांना वाव मिळुन कारागृहाचे सुधारणा व पुर्नवसनाचें ध्येयपुर्तता करण्यासाठी सर्वच प्रयत्नरत असल्याचे तसेच त्यातील गळाभेट या अत्यंत भावस्पर्श व मानवी संबंधातील सहृदयता तयार करणाऱ्या उपक्रमाचे कौतुक करून सर्वाना शुभेच्छा दिल्या .

बंदी आपल्या कुटूंबापासून दुर राहत असल्यामुळे त्यांच्यामध्ये भावनिक पोकळी निर्माण होते.गळाभेट सारख्या कार्यक्रमाच्या माध्यमातुन ही पोकळी भरून काढण्याचा प्रयत्न करण्यात येतो.या कार्यक्रमात १०० बंदयाच्या एकूण १८१ पाल्यानी प्रत्यक्ष कारागृहात आपल्या आईवडीलांची ३० मि. भेट घेतली. बंदयाना गळाभेटी मध्ये आपल्या मुलांना खावू देता यावा याकरीता कारागृहातील मार्फत बंदयाना बिस्किट, चॉकलेट, सोनपापडी, वेर्फस पॅटीस इ. वस्तू उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.






महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

इंडिया व्हीजन फांऊडेशन, दिल्ली व SLB यांच्या संयुक्त विद्यमाने येरवडा महिला कारागृहतील बंद्यासाठी रेडिओ परवाज कक्ष

# येरवडा मध्यवर्ती कारागृह

दि.०३.११.२०२५, इंडिया व्हीजन फांऊडेशन, दिल्ली व SLB यांच्या संयुक्त विद्यमाने येरवडा महिला कारागृहतील बंद्यासाठी रेडिओ परवाज कक्ष सुरु करण्यात आला. सदर कक्षांचे उद्‌घाटन मा. श्रीमती. किरण बेदी (सेवानिवृत्त भा.पो.से) माजी राज्यपाल, पॉंडेचरी यांचे शुभहस्ते करण्यात आले.

रेडिओ परवाज उपक्रमाच्या माध्यमातून महिला बंद्यासाठी मोटीव्हेशनल स्पीचेस, योगा, मेडिटेशन, आप की खातीर, बेव्हरी स्टोरिज, फ्रिडम फाईटर स्टोरी, लाईफ लेसन, पंचतत्र की कहानियॉ, महिला सक्षमीकरण, लिगल अवेरनेस, अध्यात्मिक गाणी, मनोरंजनात्मक गाणी ऐकवण्यात येणार आहेत. त्यामुळे कारागृहातील महिला बंद्यांच्या जीवनातील निराशा दुर होण्यासाठी, सकारात्मक वाटचाल करण्यासाठी निश्चितच लाभ हाईल.





महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

**राष्ट्रीय गीताला 07 नोव्हेंबर 2025 रोजी 150 वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधुन नागपूर मध्यवर्ती कारागृहामध्ये निबंध स्पर्धा , चित्रकला स्पर्धा ,लोगो डिजाईन स्पर्धा ,पोस्टर डिजाईन स्पर्धा आणि गीतगायन स्पर्धा आयोजन**


# नागपूर मध्यवर्ती कारागृह


श्री वैभव सु. आगे कारागृह अधीक्षक तथा कारागृह उपमहानिरीक्षक पुर्वविभाग नागपूर,यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर मध्यवर्ती कारागृहामध्ये वंदे मातरम सार्धशताब्दी महोत्सव मोठया उत्साहात आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यातआला.

बंकीमचंद्र चटटोपाध्याय यांनी लिहीलेल्या वंदे मातरम राष्ट्रीय गीताला 07 नोव्हेंबर 2025 रोजी 150 वर्षे पूर्ण झाल्याबद्दल संपूर्ण भारतवर्षा मध्ये मोठा आनंदोत्सव साजरा करण्यात येत आहे. याचे औचित्य साधुन नागपूर मध्यवर्ती कारागृहामध्ये निबंध स्पर्धा , चित्रकला स्पर्धा ,लोगो डिजाईन स्पर्धा , पोस्टर डिजाईन स्पर्धा आणि गीतगायन स्पर्धा अशा विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धा मध्ये कारागृहातील बंद्यानी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला.

श्री वैभव सु. आगे कारागृह अधीक्षक तथा कारागृह उपमनिरीक्षक पुर्व विभाग नागपूर यांनी नागपूर मध्यवर्ती कारागृहामध्ये अशा स्पर्धेचे आयोजन केल्यामुळे बंद्याच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो आणि बंद्यामध्ये देशभक्ती जागृत होण्यास मदत होते. या स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या बंद्याचे कौतुक केले आणि बंद्याचे मनोबल वाढविले.



## छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह

**संविधान दिनानिमीत्त भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन**

दि. 26 नोव्हेंबर 2025 छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृहात संविधान दिना निमीत्त अधिकारी व कर्मचारी यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करुन संविधान दिन साजरा करण्यात आला.



**बंद्यांकरिता टाटा ट्रस्ट यांचेद्वारे व्यसनमुक्ती या विषयावर जनजागृती व पथनाटयाचे आयोजन**

दि. 29 नोव्हेंबर 2025 रोजी टाटा ट्रस्ट व महाराष्ट्र कारागृह विभाग यांचे सांमजस्य करारानुसार (MOU) छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृहातील बंद्यांकरिता टाटा ट्रस्ट यांचेद्वारे वैयक्तिक स्वच्छता व व्यसनमुक्ती या विषयावर PAHAT FOUNDATION, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र या संस्थेच्या माध्यमातून जनजागृती व पथनाटयाचे आयोजन करण्यात आले.



महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

कारागृहातील अशिक्षित बंद्याना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रौढ साक्षरता प्रकल्प

## येरवडा मध्यवर्ती कारागृह

कारागृहातील अशिक्षित बंद्याना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि सामाजिक पुनर्वसानासाठी रोटरी क्लब ऑफ, मुंबई व रोटरी क्लब ऑफ खडकी या संस्थेमार्फत येरवडा मध्यवर्ती कारागृह व महिला कारागृहातील बंद्यांकरिता प्रौढ साक्षरता प्रकल्प सुरु करण्यात आला आहे. सदरचा प्रकल्प ०३ महिन्याकरिता असून प्रकल्पाच्या माध्यमातून कारागृहातील अशिक्षित बंद्यामध्ये त्यांच्या भुतकाळातील चुका शिकण्याची आणि सुधारण्याची संधी देवून शिक्षाणाव्दारे त्यांच्यात आत्म -सन्मान आणि सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण होईल. बंद्याना कारागृहातून सुटकेनंतर रोजगाराच्या संधी शोधण्यास आणि सन्मानाने जीवन जगण्यास मदत होईल. सदर प्रकल्पाचे उद्घाटन आज दि.२२.११.२०२५ रोजी श्री. सुनिल एन ढमाळ, अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे यांचे शुभहस्ते व संस्थेचे प्रतिनिधी श्रीमती पूनम किशन चंदानी, श्रीमती सिमा बेडेकर, श्री रोनित शहा, श्री शरद जैन, श्री इब्राहिम शेख, श्रीमती रेश्मा शेंडे, श्रीमती अनिता कापरे, श्री अदिनाथ दरवडे, श्री प्रदिप जाधव, श्री सुदिप वावरे यांचे उपस्थितीत करण्यात आले. सदर प्रकल्पात एकुण १५० पुरुष व १०० महिला बंद्यांनी सहभाग नोंदवला आहे






महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

**एकता खिचडी सामाजिक उपक्रम**

# नागपूर मध्यवर्ती कारागृह

श्री वैभव आगे, कारागृह अधीक्षक तथा कारागृह उपमहानिरीक्षक पुर्व विभाग नागपूर,यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर मध्यवर्ती कारागृहामध्ये समाजातील प्रत्येक घटक मुख्य प्रवाहात यावा, त्यांना नवी आशा व सकारात्मक दृष्टी मिळावी. या उददेशाने सुप्रसिध्द शेफ विष्णु मनोहर यांच्या पुढाकारातुन नागपूर मध्यवर्ती कारागृहात 30 नोव्हेंबर रोजी एकता खिचडी हा विशेष सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

30 नोव्हेंबर रोजी सकाळी 08.00 वा. शेफ विष्णूजी स्वत: कारागृह परिसरात एकता खिचडी तयार करण्यास सुरूवात केली. कारागृहातील 3000 कैद्यांसाठी एकूण 2500 किलो खिचडी बनविण्यात आली असून ही खिचडी बनविण्यास कैदयांनी स्वत: मदत केली. ही खिचडी प्रेम, माणूसकी, समता व एकतेचे प्रतिक असणार असून दुपारी 12.00 वाजल्यापासून कारागृहातील सर्व कैद्यांना तिचे वितरण करण्यात आले.

हा उप्रकम केवळ अन्नवाटपापुरता मर्यादित नसून, कारागृहातील कैद्यांना जीवनात सकारात्मक विचार रूजविणारा आहे.अशा सामाजिक उपक्रमामुळे कैद्यांना आपल्याही जीवनात परिवर्तन शक्य आहे, ही जाणीव होते. या उपक्रमांतुन कारागृहातील कैद्यांना मानसिक, भावनिक आणि सामाजिक स्तरावर नवी सकारात्मक ऊर्जा मिळणार असून त्यांच्या पुनर्वसनाच्या प्रक्रियेलाही निश्चितच मदत होणार आहे.

समाज, अन्न आणि माणूसकी यांचा सुंदर संगम असलेला एकता खिचडी हा उपक्रम कैद्यांसाठी एक अविस्मरणीय आणि सकारात्मक अनुभव ठरणार असून, त्यांना चांगल्या आणि सन्माननीय जीवनाकडे वाटचाल करण्यासाठी नवी प्रेरणा देणारा ठरेल.






महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

महाराष्ट्र कारागृह विभाग
सुधारणा पुनर्वसन

**जागतिक मानसिक आरोग्य महिना जनजागृती व कल्याणकारी कार्यक्रम**

## ठाणे मध्यवर्ती कारागृह

०३ नोव्हेंबेर २०२५, रोजी ठाणे मध्यवर्ती कारागृह, ठाणे येथे भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार १० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर २०२५ हा कालावधी मानसिक आरोग्य महिना म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या सौजन्याने ठाणे मध्यवर्ती कारागृहात जागतिक मानसिक आरोग्य जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यावर्षीचा विषय "आपत्ती व आपत्कालीन परिस्थितीत मानसिक आरोग्य सेवांची उपलब्धता" असा होता.

या कार्यक्रमात मानसोपचार तज्ञ डॉ. अर्चना गडकरी यांनी बदलत्या जीवनशैलीमुळे वाढणारा मानसिक तणाव, चिंता व नैराश्य याविषयी मार्गदर्शन करून वेळेवर समुपदेशन व उपचारांचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी परिचारिकांनी पथनाट्य व माहिती फलकांच्या माध्यमातून आपत्ती व्यवस्थापन व आपत्कालीन परिस्थितीत मानसिक आरोग्य सांभाळण्याबाबत जनजागृती केली.

या कार्यक्रमास कारागृह अधीक्षक श्रीमती राणी भोसले, अति. अधीक्षक श्री. राजाराम भोसले यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व बंदीजन मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमास बंदीजनांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन श्री. लक्ष्मण साळवे, शिक्षक यांनी केले.






महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

**जिल्हा नियोजन समितीमार्फत मंजूर निधीतून करण्यात आलेल्या कामांचा लोकार्पण सोहळा (नवीन अत्याधुनिक पाकगृह व वरिष्ठ तुरुंगाधिकारी निवासस्थान)**

# चंद्रपूर जिल्हा कारागृह

चंद्रपूर जिल्हा कारागृह, वर्ग-1 येथे जिल्हा नियोजन समिती, चंद्रपूर यांच्या स्थानिक निधीतून मंजूर करण्यात आलेले बाहेरील पश्चिमेकडील मुख्य प्रवेशद्वार, वरिष्ठ तुरुंगाधिकारी श्रेणी-1 यांची दोन निवासस्थाने तसेच अद्यावत नवीन पाकगृह यांचा लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला होता. सदर लोकार्पण सोहळा सन्मा. श्रीमती समृध्दि भीष्म, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, चंद्रपूर यांच्या शुभहस्ते पार पडला. सदर कार्यक्रमास विशेष प्रमुख पाहुणे म्हणून सन्मा. श्री. प्रशांत कुलकर्णी, मुख्य न्याय दंडाधिकारी, चंद्रपूर, सन्मा. श्री. सुधीरकुमार इंगळे, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर, मा. श्री. मुकेशकुमार टांगले, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. 2, चंद्रपूर तसेच श्री. अनुपकुमार कुमरे, कारागृह अधीक्षक, श्री. सतिश सोनवणे, वरिष्ठ तुरुंग अधिकारी, श्री. मिलिंद बन्सोड, अति. वरिष्ठ तुरुंग अधिकारी, श्री. संजीव हटवादे, शिक्षक व कारागृहातील अधिकारी/कर्मचारी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.








महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

# चंद्रपूर जिल्हा कारागृह



अत्याधुनिक नविन पाकगृह

## कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर

दिनांक 12/11/2025 रोजी चंद्रपूर जिल्हा कारागृह येथे सन्मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर यांचेमार्फत बंद्यांसाठी मोफत कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले.



## नेत्र तपासणी शिबीर

समता फाउंडेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने चंद्रपूर जिल्हा कारागृह येथे नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. सदर शिबिरामध्ये 107 पुरुष व 09 महिला बंद्यांची नेत्र तपासणी करून औषधांचे वाटप करण्यात आले.



## ठाणे मध्यवर्ती कारागृह

**समता फांऊडेशन या सेवाभावी संस्थेच्या वतीने त्वचारोग वैद्यकीय शिबीराचे आयोजन**

दिनांक ०८.११.२०२५ रोजी, ठाणे मध्यवर्ती कारागृह, ठाणे येथे समता फांऊडेशन या सेवाभावी संस्थेच्या वतीने त्वचारोग वैद्यकीय शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. डॉ.रवि यादव यांनी बंदयाची तपासनी करून उपचार केले.लाभार्थी पुरुष बंदी संख्या - १५२, तृतीय पंथी बंदी संख्या - ०२




**ठाणे मध्यवर्ती कारागृहातील बंदयाची सोलर पॅनल इन्स्टॉलेश टेक्नीशियसन्स व डेटा इंट्री ऑपरेटर या व्यवसाईक कोर्सची परिक्षा**

दिनांक २४.११.२०२५ रोजी ठाणे मध्यवर्ती कारागृहातील बंदयाची सोलर पॅनल इन्स्टॉलेश टेक्नीशियसन्स व डेटा इंट्री ऑपरेटर या दोन व्यावसाईक कोर्सची परिक्षा सिटी ट्रान्सलिंक प्रा.लि. या संस्थेच्यावतीने आयोजित केली होती. सदर दोन्ही कोर्सचे प्रशिक्षण श्री. रुरल डेव्हलपमेंट ट्रस्ट,बंगलोर यांनी दिले आहे. सदर परिक्षामध्ये अनुक्रमे २३ व ३३ असे एकूण ५३ बंदयांनी परिक्षा दिलेली आहे.





महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

# भंडारा जिल्हा कारागृह

**समता फाऊंडेशन , मुंबई यांच्या मार्फत 10 दिवसीय विपश्यना शिबीरामध्ये 16 बंद्यांचा सहभाग**

भंडारा जिल्हा कारागृह येथिल बंद्यांचे मानसिक आरोग्य सुस्थीतीत राहावे व मनाची एकाग्रता व मनपरिवर्तन घडवुन आणण्याकरीता दि. 18/11/2025 ते 27/11/2025 पर्यंत 10 दिवसीय विपश्यना शिबीर समता फाऊंडेशन, मुंबई यांच्या मार्फत घेण्यात आला. सदर शिबीरामध्ये 16 बंद्यांचा सहभाग होता. सदर शिबीराचे उद्घाटन मा. श्री. बुराडे साहेब, सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण भंडारा यांच्या हस्ते करण्यात आला. 10 दिवसीय विपश्यना शिबीर आचार्य श्री. पराग रामटेके व समता फाऊंडेशनचे प्रतिनिधी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु होता. सदर शिबीरामुळे बंद्यांचे मन परिवर्तन घडवुन आणण्यास व बंद्यांमध्ये शांततेची भावना निर्माण होण्यास मदत झाली. सदर शिबीरादरम्यान कारागृह अधिकारी व कर्मचारी यांचे सहाय्य लाभले.



**किर्तनकार श्री. ह.भ.प. श्री. निलेश भैया झरेगावकर यांनी भंडारा जिल्हा कारागृह येथे किर्तन**

किर्तनकार श्री. ह.भ.प. श्री. निलेश भैया झरेगावकर यांनी भंडारा जिल्हा कारागृह येथे दि. 28.11.2025 रोजी किर्तनाद्वारे माणसाच्या स्वभावाचे विविध रंग व रंगाच्या विविध छटा यांचे सुंदर आणि श्रवणीय असे विश्लेषण प्रबोधनातुन बंदी बांधवांना दिले, किर्तन हे समाज प्रबोधनाचे किती मोठे साधन आहे यातुन माणसाचे मनपरिवर्तन करणे शक्य आहे. हे बंदी बांधवांना किर्तनाद्वारे महाराज यांनी उदबोधन केले. ह.भ.प. श्री. निलेश भैया झरेगावकर महाराज यांनी केलेल्या किर्तनामुळे बंद्यांच्या मनावर निश्चित अनुकुल परिणाम होण्यास मदत होणार आहे.



महाराष्ट्र शासन

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,


कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

**संविधान गुण गौरव परिक्षा-2025**

# भंडारा जिल्हा कारागृह

दिनांक 26/11/2025 रोजी भंडारा जिल्हा कारागृह वर्ग-1 येथिल बंद्यांकरीता सुजान नागरीक मंच रायगड या सामाजिक संस्थेमार्फत राज्यस्तरावर संविधान गुण गौरव परीक्षा 2025 हा उपक्रम 26 नोव्हेंबर 2025 रोजी संवधिान दिनाचे औचित्य साधुन राबविण्यात आला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश भारतीय संविधानाचे ज्ञान तसेच सामाजिक पुनर्वसनाच्या दृष्टीने आणि कैद्यांमध्ये संविधानकि मुल्यांची रुजवण होण्यासाठी भंडारा जिल्हा कारागृहातील 46 पुरुष बंदी व 4 महिला बंदी एकुण 50 बंदी संविधान गुण गौरव परिक्षा या उपक्रमात सहभागी झाले. सदर परिक्षेचे आयोजन प्रा. युवराज दयाराम खोब्रागडे, कार्याध्यक्ष संविधान गुण गौरव समिती, श्री. अनिल मेश्राम, डॉ. चोपराम गडपायले, डॉ. पांडुरंग कोडवते यांनी केले.





# रत्नागिरी विशेष कारागृह

**समता फाऊंडेशन, मुंबई या सेवाभावी संस्थेच्या सहकार्याने कारागृहात नेत्र तपासणी शिबीर आयोजन.**

कारागृहातील बंदीस्त बंदी बांधवांचे आरोग्याचे दृष्टीने समता फाऊंडेशन, मुंबई या सेवाभावी संस्थेच्या सहकार्याने कारागृहात दिनांक 24/11/2025 रोजी नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीरामध्ये अनुभवी तसेच तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांचेकडून कारागृहातील बंदीस्त सर्व पुरूष तसेच महिला बंदी तसेच अधिकारी/कर्मचारी यांची नेत्र तपासणी करण्यात आली.





**मानसिक आरोग्य कार्यशाळा कार्यक्रम**

दिनांक 28/10/2025 रोजी जिल्हा शासकीय रूग्णालय, रत्नागिरी येथील डॉ.स्नेहल तोडकर, श्रीमती.शिल्पा गोठणकर, श्रीमती.श्वेता चव्हाण यांचे मार्फत कारागृहातील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचेकरीता मानसिक आजाराची लक्षणे, निदान, औषधोपचार, समुपदेशन व उपाय या बाबत जनजागृती करीता मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



# रत्नागिरी विशेष कारागृह

**वृक्षारोपण अभियान कार्यक्रम**

मा.शासन तसेच मा.मुख्यालय, पुणे यांचे आदेशान्वये वृक्षारोपण अभियाना अंतर्गत रत्नागिरी विशेष कारागृहाचे परिसरामध्ये कारागृहात कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तसेच सदर वृक्ष लागवड मोहिमेमध्ये कारागृह परिसरात 2385 वृक्षांची लागवड करण्यात आली.



**व्यसनमुक्ती तसेच स्वच्छता मार्गदर्शनपर कार्यक्रम**

परमपुज्य स्वामी बाळ सत्याधारी महाराज, व्यसनमुक्ती सेवा केंद्र, खेडशी, रत्नागिरी या सेवाभावी संस्थेच्या सहकार्याने कारागृहातील बंदीस्त बंदीबांधवांकरीता तसेच अधिकारी/कर्मचारी यांचेकरीता आरोग्याच्या दृष्टीने व्यसनमुक्ती तसेच स्वच्छतेबाबत मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर कार्यक्रमादरम्यान उपस्थित बंदीबांधवांना व्यसनापासुन दूर राहत आरोग्याची काळजी कशी घ्यावी याबाबत मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले.



महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

**अत्याधुनिक स्वयंपाकगृह व सेप्रेट विभाग**

## भायखळा जिल्हा कारागृह

शुक्रवार दिनांक 03.10.2025 रोजी भायखळा जिल्हा कारागृह येथे अत्याधुनिक उपकरणांसह सुसज्ज स्वयंपाकगृह व सेपरेट विभाग या नवीन इमारतींचे उदघाटन सन्मा.श्री सुहास वारके, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे हस्ते करण्यात आलेले आहे. सदर कार्यक्रमासाठी सन्मा.श्री.योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच उदघाटनाकरीता मा.श्री.हर्षद अहिरराव, अधीक्षक, मुंबई मध्यवर्ती कारागृह यांनी उपस्थिती दिली. सदर कार्यक्रमाचे आयोजन श्री.विकास ह.रजनलवार, अधीक्षक, भायखळा जिल्हा कारागृह यांचे मार्फत करण्यात आले.

जिल्हा वार्षिक योजना सन 2023-2024 या आर्थिक वर्षातील मंजुर निधीतुन भायखळा जिल्हा कारागृहात नविन स्वयंपाकगृह, स्टोअर रूम, गॅस सिलेंडर रूमचे बांधकाम तसेच स्वयंपाकगृहाकरीता कोल्ड स्टोरेज रुमसह नवीन मॉड्युलर किचन उपकरणे खरेदी करण्यात आले आहेत. जुने व पारंपारीक पध्दतीने बंद्यांचे जेवण तयार करतांना बंदीबांधवांना अनेक अडचणी उध्दभवत होते. यामुळे कारागृहातील बंदयांकरीता व लहान मुलांचे आरोग्याचे दृष्टीने आरोग्यदायी असे अत्याधुनिक व सुसज्ज स्वयंपाकगृहाची उभारणी करण्यात आलेली आहे. यामुळे बंद्याचे जेवण बनवणे अगदी सुलभ,स्वच्छ व तात्काळ होणार आहे. तसेच कारागृहाच्या आवारात तृतीयपंथी व आजारी बंद्यासाठी 6 सेप्रेट सेलचे बांधकाम करण्यात आले आहे.





महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

**नामकरण सोहळा**

## मुंबई जिल्हा महिला कारागृह




मुंबई जिल्हा महिला कारागृह येथे दिनांक 08 ऑक्टोबर 2025 रोजी महिला व बालकांचे हक्क व कल्याण समिती (विधानसभा व विधानपरिषद 11 सदस्य) यांनी भेट दिली. सदर भेटी दरम्यान कारागृहातील महिला विभाग-2 येथे बंदीस्त असलेल्या महिला बंदी यांनी कारागृहामध्ये बंदीस्त असताना जन्म दिलेल्या दोन नवजात लहान मुलांचा नामकरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. सर्व सदस्य समिती यांचे उपस्थितीमध्ये नवजात दोन्ही लहान मुलांचा नामकरण सोहळा उत्कृष्ट्रपणे संपन्न झाला.



## अकोला जिल्हा कारागृह

**सव्हील हॉस्पीटल व समता फाऊंडेशन यांच्यामार्फत आयोजीत आरोग्य शिबीरे**

जिल्हा शल्य चिकित्सक अकोला व धर्मादाय आयुक्त यांच्यामार्फत कारागृहातील बंद्याचे आरोग्य उत्तम राहावे यादृष्टीकोनातुन जिल्हा शल्य चिकित्सक, अकोला यांचे मार्फत दिनांक 27.11.2025 रोजी ORAL CANCER बाबत कारागृहातील 40 बंद्याची तपासणी केलेली आहे. दिनांक 28.11.2025 Brest Cancer + Oral cancer 37 महिला बंद्याची तपासणी केलेली आहे. दिनांक 29.11.2025 रोजी ECG करण्यात आलेली यामध्ये 10 बंद्यानी सदर शिबीराचा लाभ घेतला आहे.

समता फाऊंडेशन यांचे मार्फत महिला बंद्याकरीता त्वचारोग तपासणी केलेली आहे.




**समता फाऊडेशन यांचे मार्फत आयोजीत चित्रकला स्पर्धे**

अकोला जिल्हा कारागृह – बंद्याना कला गुणाना वाव देण्याकरीता समता फाऊडेशन यांचे मार्फत आयोजीत चित्रकला स्पर्धेचे प्राविण्य प्राप्त बंद्याना प्रशंसापत्रक वाटप कार्यक्रम केलेली आहे.



महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

## अकोला जिल्हा कारागृह

**बंद्याकरीता कांबळ वाटप**

अकोला जिल्हा कारागृहात व-हाड संस्था अमरावती व अवतार मेहरबाबा बहुद्देशीय संस्था,अमरावती यांचे संयुक्त विद्यमानाने कारागृहातील बंदी बंद्याकरीता 50 कांबळ वाटप व प्रबोधनपर कार्यक्रम




**जिल्हा नियोजन समिती अकोला यांचे मार्फत सन २०२५-२६ योजने अंतर्गत Strengthening to servent quarter in Premises of Central Jail**

जिल्हा नियोजन समिती अकोला यांचे मार्फत सन २०२५-२६ योजने अंतर्गत Strengthening to servent quarter in Premises of Central Jail (No of Qtrs १०+१५ एकुण २५ ) करीता ४९.९९+४९.९९ लक्ष निधी मंजुर केलेला असुन सदर काम सद्यास्थित सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला यांचे मार्फत प्रगतिपथावर आहे.



